Pune, Vol.: 5, 7th issue, Sep 2024 (Monthly), Price: 100/- Pages: 48

# डायनोदादा

कविता - विद्याधर शुक्ल | चित्र - हबीब अली

एकदा मोठा डायनोदादा
रोजची वाट चुकला
जंगल सोडून सरळ शहरामध्ये शिरला

चौथ्या मजल्याच्या खिडकीतून
तोंड आत घातले
चिनू पिनू आले धावत,
हाय हॅलो केले

लागली त्याला तहान, मोठे पिंप दिसले
दोन तीन घोटात पाणी घटकन पिऊन टाकले
वाटेत गोड फळांचा बाजार मोठा लागला
टेम्पो भरून पेरू हादडून नाश्ता मस्त झाला

आला मोठा तलाव धपकन उडी मारली
पाणी उडाले उंच, गल्ली भिजून गेली
इकडे तिकडे भटकला भूक लागली सडकून
चार पोती शेंगदाणे टाकले गट्ट करून

एक ट्रकभर ऊस खाऊन केला फस्त
दोनशे नारळांचे पाणी पिऊन झाला चुस्त
आईस्क्रीमच्या दुकानातले सगळे आईस्क्रीम चापले
एवढे खाऊन पोट आता थोडे तरी भरले

जेवून सुस्त झाल्यावर जाम झोप आली
टेकडी घेऊन उशाला स्वारी घोरु लागली

Amul
Milk

## प्रिय आईबाबा,

आपल्या लहानपणी 'ज्युरासिक पार्क' मधून डायनोसॉरची ओळख आपल्याला झाली आणि या महाकाय प्राण्यांविषयी वेगळीच भीतीमिश्रित उत्सुकता तयार झाली. आताच्या मुलांनाही डायनॉसॉर्सचं तेवढंच आकर्षण आहे जेवढं आपल्याला होतं. त्यांचा अवाढव्य आकार, वेगवेगळे प्रकार, पृथ्वीवरून गायब होऊन जाणं या सगळ्यातली गूढ पण भारी वाटणारी गंमत मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा खास अंक काढत आहोत. याविषयी भरपूर माहिती इंटरनेटवर आहे त्यामुळे काल्पनिक ड्रॅगन आणि लुप्त झालेले डायनॉसॉर्स, यांच्या गमतीशीर गोष्टी अंकात देण्याचा प्रयत्न केला आहे. डायनोबाबरोबर धमाल करत मुलांबरोबर हा अंक वाचा आणि तुमच्या प्रतिक्रिया नक्की पोहोचवा.

**अमृता कावणकर**
Editor, Co-Founder

**जुई चितळे**
Co-Editor

चित्र - भक्ती दलाल




**हा** खादाडासॉरस आणि रडकूसॉरस बघितलास का? आता बाकीच्या डायनोसॉरसना तू नाव सुचव आणि लिही. त्यांना छान रंगव.




**डॅनी** ड्रॅगनची १० रंगीत अंडी अंकात कुठे कुठे लपलेली आहेत. प्रत्येक अंड्याचा रंग वेगळा आहे. दहा अंडी शोधून काढशील? ज्या रंगाची अंडी तुला दिसतील तशी इथे ही अंडी रंगव.

पान नं. ५

चित्र - मधुरा वाणी

# डायनोसॉरची आजी

गोष्ट - गिरीश जठार | चित्र - शुभम लखेरा

एकदा एक मगर तळ्याकाठी ऊन खात पसरली होती. तितक्यात एक शहामृग तिथे आला. ''मगरबाई, जरा कडेला जाऊन पसर की. यायला जायला त्रास होतोय! मगरबाई ढिम्म पडून होती.

''काय गं, तुझ्याशी बोलतोय! बाजूला हो. या पाण्यावर पहिला हक्क आमचा आहे. आम्ही पक्षी खरंतर तुझ्याआधी इथे आलोय.'' हे ऐकून मगरीने फटकन डोळे उघडले, ''शहामृगा लेका... माझ्याशी नीट बोलायचं हं! आणि काय म्हणालास? माझ्या आधी तुम्ही आलात होय इथे? तुला माहितीये तरी का, जेव्हा पक्ष्यांचा 'प'सुद्धा नव्हता तेव्हापासून आम्ही मगरी पृथ्वीवर राहतोय. त्या महाकाय डायनोसॉरच्याही आधीपासून.''

''काय! डायनोसॉर खरंच होते का तरी?'' शहामृग म्हणाला.

''होते म्हणजे काय १००% होते. तेव्हा पृथ्वीवर एकही पक्षी नव्हता आणि या जंगलातले प्राणीसुद्धा नव्हते तेव्हा. पाण्यात, जमिनीवर सगळीकडे या अवाढव्य प्राण्याचं राज्य होतं. आम्ही मगरी तेव्हासुद्धा इथे होतो.''

''ते होते तर मग अचानक गायब कुठे झाले?'' शहामृगाने विचारलं.

''सांगते थांब...'' मगर पुढचे पाय दुमडून बसली. आणि सांगू लागली...

''ही माझी सगळ्यात आवडती गोष्ट आहे. माझी आजी मला सांगायची..... तो दिवस खूपच भयंकर होता. एक मोठा आगीचा गोळा आपल्या पृथ्वीवर येऊन दणकन आदळला. धडाम धुडूम आवाज झाला. धूळ आणि आगीचे लोट पसरले. सगळं सगळं जळून खाक झालं. मोठ-मोठाले, अजस्त्र डायनोसॉर त्या महाभयंकर स्फोटात मारले गेले. आमचं मगर कुटुंब पाण्याखालीच दडून बसलं होतं. त्यामुळे आम्ही वाचलो.''

''बापरे! सगळेच्या सगळे डायनोसॉर मेले?''

''सगळे नाही, काही मध्यम आणि छोटे डायनोसॉर वाचले होते.''

''मग त्यांचं काय झालं? ते कुठे गेले?'' शहामृगाने विचारलं.

''त्यातले काही झाडावर राहू लागले. ते फळं खायचे. या झाडावरून त्या झाडावर तरंगत जायचे. हळू हळू मग ते उडायला लागले. त्यातूनच मग पक्षी तयार झाले.''

''काय? पक्षी आधी डायनोसॉर होते?''

शहामृगाला धक्काच बसला.

''येस्स. आणि काही डायनोसॉर जमिनीवरच राहू लागले. त्यांनापण खूप वर्षांनी पक्ष्यांसारखे पंख, पिसं फुटली. पण ते काही उडू शकले नाहीत. आणि लेका तुम्ही शहामृग म्हणजे तेच डायनोसॉर आहात. न उडणारे पक्षी!''



''बापरे! खरंच मगरबाई? म्हणजे माझे खापर खापर खापर खापऽऽऽऽऽऽर पणजोबा डायनोसॉर होते?''
''येस्स. पण तुझ्या त्या खापऽऽऽऽऽ र पणजोबांच्याही आधीपासून मगरी इथे आहेत हे विसरू नकोस!''
''नाही विसरणार. तू तर डायनोसॉरची आजी आहेस.'' शहामृग म्हणाला.

''आता कसं.... आणि अजून एक गंमत माहितीये? आपण दोघेसुद्धा एकमेकांचे नातेवाईकच आहोत. तुझे पाय बघ. माझ्या पायावर आहेत तसेच खवले आहेत तुझ्या पायांवर...''

''अरे खरंच की... म्हणजे तू माझीसुद्धा आजी आहेस!''

''येस्स... आणि हो एक सांगायचं राहूनच गेलं... माझ्याशी....''
''हो... आलं लक्षात.. तुझ्याशी नीट बोलायचं!'' शहामृग म्हणाला.
मगर आणि शहामृग जोरजोरात हसायला लागले.



**निसर्गविषयक बुद्धिमत्ता**

निसर्गात किती आणि काय काय आहे. त्याविषयी मुलांना कुतूहल आणि आपुलकी वाटावी यासाठी हे सदर आहे.

## हॅलो, मी ब्रेनी



डॉ. गार्डनर यांच्या Theory of multiple intelligences या सिद्धांतानुसार आपल्या मेंदूत आठ वेगवेगळ्या बुद्धिमत्ता कमी-जास्त प्रमाणात असतात. त्यातल्या दोन- तीन बुद्धिमत्ता ठळक असतात. पहिल्या काही वर्षांमध्ये मुलांचा मेंदू एखाद्या स्पंजसारखा असतो; त्याला जे मिळेल ते तो शोषून घेतो. चिकूपिकूच्या अंकांमधून या आठ बुद्धिमत्तांचे सहज, सोपे अनुभव मुलांना मिळावेत यासाठी आम्ही प्रयत्न करतो.

# करके देखो

## पेपरडिशचा डायनो



एक पेपरप्लेट घेऊन ती अर्धी काप. डायनोसॉरची मान, शेपूट, पाय, पाठीवरचे खवले वेगळ्या कागदावर काढून रंगव आणि कापून घे. चित्रात दाखवले आहेत तसे ते भाग चिकटव आणि डोळे, तोंड काढ.

## हातांच्या आऊटलाईनचा डायनो

हाताची आऊटलाईन काढून घे किंवा रंगात हात बुडवून हाताचा छाप घे. आता त्यावर मान, डोळे, तोंड काढून तुझा डायनोबा पूर्ण कर.



## फुग्याचा डायनो

तुझ्या आवडीच्या रंगाचा फुगा घेऊन फुगव. वेगळ्या कागदावर डायनोसॉरचं तोंड, शेपूट, पाय काढून कापून घे आणि फुग्यावर डिंकाने किंवा टेपने चिकटव. या डायनोसॉरशी तू उड्या मारत, त्याला उडवत खेळूही शकशील.

# WHAT IF?

Story - Nivedita Nilam
Illustration - Onkar Bagawe

Babli, the tiny Yakkasaurus, was feeling sad. Why? You ask? Well, she didn't feel special. She didn't have three fancy horns like the Triceratops, sharp teeth like the T-Rex, a spiky tail like the Stegosaurus nor did she have a long neck like the Apatosaurus.

In fact, everyone made fun of her because all she did was yak yak yak. Yes! She could talk all day, every day, with everyone, LITERALLY EVERYONE!

What should I do? Should I stop talking? Babli sat alone by the Yucatan Lake thinking, when suddenly a ginormous ball came speeding towards the Earth! All the dinosaurs started running helter-skelter. Babli knew that was not going to help! She mustered up some courage and did something she was best at. She spoke with ALL HER MIGHT. "STOOOOOOPPPPPPPPPPPPPPP!"

And to everyone's surprise, the huge ball stopped just short of hitting the ground! Taking a closer look, Babli realised that the ball was actually a Spaceship!

From the top of the ball, out popped a head! Was it an alien that they all had just seen? Many more aliens started appearing behind their leader.

All the dinos were too shocked to move but not Babli. She could talk to EVERYONE! Remember?

“Welcome to our planet! We are all Earthlings. We don’t mean any harm.”, Babli said. “Who are you? Where have you come from?”

“I am Giggle Puff, the leader of the Gigglelians. We have come from planet Giggle, from the Andromeda Galaxy.” said the Alien leader with a giggle. “Sorry we almost crashed into your planet. It’s so small, our spaceship radar missed it!”

What had just happened? Had the Dinos made new space friends? Babli introduced them to her friends Tricera, T-rex and Stego. Giggle Puff introduced his folks. “Meet little Chuckles, Ms. Grin, Mrs. Smile, Mr. Snickers, Grandpa ROFL....” And he added with a big grin, “All of us are known for our LAUGHTER!” A ripple of laughter broke out after he said that. How lovely, Babli thought.

She also realised, “My talking had just saved all the Dinos!”  I should be proud of being talkative!



The dinos had fun exploring the giant spaceship. And soon, it was time for Gigglelians to continue on their space adventure. Giggle Puff asked Babli and the other dinos, “Would you all like to join us?”

And guess what? All the Dinos thought space adventure was the best idea ever! And off they went. Where do you think they went next? Planet Giggle? Andromeda Galaxy?

Let’s play the “What if” imagination game. Can you come up with a story about what happened to the dinosaurs? Did they suddenly become tiny? Come up with fun stories and share them with us.

**या छोट्या ड्रॅगनला आकड्यांच्या रंगाप्रमाणे रंगव.**

**गणिती तार्किक बुद्धिमत्ता**
तर्क लावून विचार करणं या बुद्धिमत्तेमुळे शक्य होतं.
ॲक्टिव्हिटीजमधून या बुद्धिमत्तेचे अनुभव मुलांना देता येतील.







- अनुभा चौरे

# ढोंगी

गोष्ट -अमृता गोटखिंडीकर
चित्र - सानिका देशपांडे

घनदाट जंगलातील ती रात्रीची वेळ. किर्र अंधार, धो धो कोसळणारा पाऊस. आकाशात मध्येच कडाडणाऱ्या विजा. इजा.. बिजा.. तिजा. सगळे प्राणी अगदी चिडीचूप.

एका मोठ्या कदंबाच्या झाडाखाली घाबरट सशांची वस्ती होती. सगळे ससे भुसभुशीत जमिनीत एकमेकांना बिलगून बसले होते. त्यांना जाणवलं, जमीन थरथरते आहे. आधी थोडी.. मग जास्त.. मग अजून जास्त....

ससे घाबरले, पळायला लागले, जोरात ओरडले. ते ऐकून बाजूच्या बिळातून उंदीर बाहेर आले. तेवढ्यात झाडापाशी जोरात आवाज आला. धाड.. धाड.... धाड...

धपाधप पावले टाकीत कोणीतरी येतंय. वीज चमकली आणि त्या प्रकाशात जे काही दिसलं ते दिसलं. गवतावर निजलेल्या हरणाने पाहिलं. झाडावरच्या होलांच्या थव्याने एकदम उडून गोंगाट केला. ससे आणि उंदरांची तर बोबडी वळली. हत्तींच्या कळपाने चित्कार केला.
रात्रभर जंगलात एकच चर्चा. ''जंगलात राक्षस आलाय.'' ''त्याला सहा शिंगे आहेत. त्याचे सुळे तर हत्तीच्या सुळ्यांसारखे टोकदार आहेत.''

''डोळे तर विचारू नका...

लाल पिवळे... १०० काजवे एकत्र केल्यासारखे!''

''त्याला शेपटीपण आहे.. जाड... काटेरी.''

''शेपटी नाही ती तर त्याच्या कमरेला बांधलेली तलवार आहे. एका फटक्यात चार सिंहांना गारद करेल.'' या असल्या गप्पा. चिटकू उंदीर पळत पळत साळू साळिंद्रापाशी आला. आणि म्हणाला, ''साळू, काहीतरी कर गं. तुझा तो काट्यांचा पिसारा फुलव आणि टाक त्या राक्षसावर. नाहीतर आपलं काही खरं नाही.''

साळिंदर म्हणाली,

''अरे मला कसं जमणार त्याच्याशी लढायला. मी बाई एक बारकी साळिंदर. त्यापेक्षा आपण पाणघोड्याकडे जाऊ. बॉडी बिल्डर आहे ना तो.''

चिटकू आणि साळू पाणघोड्याकडे गेले. पाणघोडा म्हणाला, ''मी लढलो असतो रे. पण हल्ली पाण्यात उभे राहून राहून गुडघे दुखतात राव. तुम्ही सिंहाला का नाही विचारत?'' चिटकू,साळू आणि पाणघोडा सिंहाकडे गेले. सिंह म्हणाला, ''लढलो असतो रे.. पण नुकताच दात पडलाय रे माझा. बघितलं का गाल कसा सुजलाय.. नाहीतर माझ्यासमोर त्या राक्षसाची खैर नाही.''

सगळ्यांची ही कारणे ऐकून चिटकू उचकला आणि म्हणाला,

चिटकूचा तो आवेश बघून सगळे लढाईला तयार झाले. जंगलातले इतर प्राणीसुद्धा आले. वाघ, सिंह, हत्ती, ससा, अस्वल, हरीण, माकडे, साप, मुंगूस, चित्ता, बिबट्या... सगळे चिटकूच्या मागे चालायला लागले. सातभाई पक्ष्यांनी बातमी आणली, राक्षस दरीच्या टोकापाशी आहे. सारे प्राणी दरीपाशी पोहोचले आणि झाडांच्या मागे लपले. पाहतात तो काय? राक्षस अगदी टोकाला दरीत पाय सोडून बसला होता. बराच वेळ गेला तरी राक्षस उठेना. सगळे प्राणी कुजबुजू लागले. काही म्हणाले, चला आपण घरी जाऊ. काही म्हणाले त्याला दरीत ढकलून देऊ. चिटकू म्हणाला, ''थांबा.. मी जरा पुढे जाऊन बघतो.. नेमकं झालंय तरी काय ते.'' खरं तर चिटकू खूप घाबरला होता. पण तो हळूहळू पुढे गेला. राक्षसाजवळ पोचल्यावर त्याने घाबरून घट्ट डोळे मिटले. आणि जोरात आवाज दिला.. ''ए शुक शुक.'' राक्षसाने मागे वळून पाहिलंसुद्धा नाही. चिटकू परत ओरडला, ''ए शुक शुक'' आता राक्षसाने मागे वळून पाहिलं. त्याचा चेहरा अगदी उदास होता. हळूहळू त्याचे डोळे पाण्याने डबडबले आणि राक्षस चक्क रडायला लागला. ''रव्ह्या ह्या ह्या.... काय सांगू तुला.. कुठे गेला माझा बछडा..? थोडंसं रागावलं तर असं निघून जातात का.. ह्या ह्या..'' राक्षस रडायचा काही थांबेना. चिटकू बघतच राहिला. अहो लढाई वगैरे बाजूलाच राहिली ना. शेवटी धीर करून चिटकूने विचारले.

''कोण कुठे गेला? आणि तू इतका रडतोस?'' मग तर राक्षसाने जे काही भोकाड पसरले की ज्याचे नाव ते. आता सगळे प्राणी बाहेर आले.



**भाषिक - वाचिक बुद्धिमत्ता**

गोष्टींमधून मुलं नवे शब्द शिकतात. सहज वापरतात. मुलांचा भाषा शिकण्याचा वेग जास्त असतो.

तेवढयात एक मोठी पाल आणि हत्तीसारखा विचित्र दिसणारा प्राणी त्यांच्यातून बाहेर आला. त्याला पाहताच राक्षस ओरडला, ''गोगीऽऽऽ'' त्या प्राण्याने पण उत्तर दिलं.. ''गोगी गोगी.....'' आणि काय सांगता.. त्या दोघांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली. एकमेकांना चाटू लागले. पाप्या घेऊ लागले. सगळ्यांना कळले अरे हे तर राक्षसाचे बाळ!

सगळ्या प्राण्यांची चर्चा सुरू झाली.

''अरे, ही तर गोगीची आई!'' ''आई कधी राक्षस असते का? काहीतरीच.''

''असा कसा गोगी निघून आला? आई शोधणारच बाळाला. म्हणून आली ही आपल्या जंगलात.''

''बिचारा गोगी'' ''बिचारी आई''

..तेवढयात चिटकू म्हणाला,

''पण ही आहे तरी कोण? इतका मोठा प्राणी आपण पाहिलाच नव्हता कधी.''

गोगीची आई म्हणाली, ''मी तर काहीच नाही. गोगी आणि मी सापडत नाही म्हणून उद्या गोगीचा बाबा येईल आम्हाला शोधत. तेव्हा तुम्ही पाहतच राहाल....''

(एका इंग्रजी कथेवर आधारित)

**हे डायनोसॉर्स कसे बरं दिसत असतील?**

हाडांच्या सापळ्याभोवती आऊटलाईन काढून डायनोसॉरचं चित्र काढ. आता वॉटर कलर्सने त्यांना रंगव म्हणजे आतला सापळापण दिसेल.

- अनुभा चौरे



## कुठल्या डायनोचं कुठलं पिल्लू?

रेषांनी जोड्या लाव. पण या रेषा एकमेकांना क्रॉस न करता तुला जोड्या लावता येतील का?

गोष्ट - क्षितिज पटवर्धन
चित्र - ओंकार बागवे

ही आहे आज्जीबाई आणि हा आहे अक्कू. आज्जीबाई अक्कूला मराठी अक्षरांची कोडी विचारते, गंमत गोष्टी सांगते. दर महिन्याला आपण वाचणार आहोत 'आज्जीबाई, अक्कू आणि मराठी अक्षरांच्या गमती–जमती!'
अशाच अजून गमती–जमती पाहायच्या असतील तर ''आज्जीबाई जोरात'' हे नाटक नक्की पाहा!

## अ, आ, इ, ई,...

एकदा अक्कूवर आ सोडून बाकी सगळे स्वर रुसून बसले. त्यामुळे अक्कू सगळं 'आ'च्या भाषेत बोलायला लागला. खालची वाक्यं वाचून तो नक्की काय म्हणतोय ते कळतंय का बघ आणि त्याला वाक्य दुरुस्त करून सांग. एक वाक्य मात्र बरोबर आहे ते कोणतं ओळख बरं.

माला भाका लागाला.
माला ताखाटा चावाडा आवाडाता नाहा.
माझा बाबा आला. त्याना लाडा आणाला.
माला लाडा आवाडाला.
मा दाहा लाडा खाल्ला.

# डायनोबाचे दात

गोष्ट - विद्याधर शुक्ल
चित्र - श्रीनिवास बाळकृष्ण

एक होता डायनोबा. ताड माड उंच आणि चांगलाच दांडगोबा.
त्याला होते दात हजार. टोकीदार बाकदार .
डायनोबा होता द्वाड आणि चांगलाच खादाड.
बका बका खायचा. दात नाही घासायचा. चूळ नाही भरायचा.
मग काय होणार? बरेच दात किडले. काळे निळे झाले. जाम ठणकू लागले.
“आयाई ग उईउई” रडत ओरडत, दवाखान्यात गेला कण्हत.
म्हणाला, “ डॉक्टर गोळी द्या नाहीतर दात उपटून टाका.”

बॅटरी आणि हातोडी घेतली,डॉक्टर तयार झाले.
पण उंच तोंडात जायचं कस? कोड्यात पडले.
चढू का मी दोरी लावून? का जाऊ वर शेपटीवरून?
खूप डोके खाजवले. शेवटी झाडावरून, भरा भरा चढले.
आ केला डायनोबाने, डॉक्टर जबड्यात शिरले बेताने

एवढा एवढा एकेक दात, तपासला लावून हात
काळा काळा दात दिसला, हातोडीने घाव घातला

खटाक खट पाडून टाकला. वरून सरळ खाली फेकला.



ऐकून डायनोबा भडकला, त्याने गपकन जबडा मिटला
डॉक्टर काका आता अडकले, वाचवा वाचवा ओरडू लागले
डायनोबा म्हणाला, गावातून एक डॉक्टर झाला कमी. तर काय होणार आहे?
हज्जार डॉक्टर गल्ली बोळात,काय फरक पडणार आहे?
डॉक्टरांना चूक समजली. डायनोबाची माफी मागितली.
बोलले" डायनोबा डायनोबा, अगदी सॉरी बाबा. उद्या परत येईन.
ऑपरेशन करीन. चांगले चांगले दात परत बसवून देईन."
मग डायनोबा शांत झाला.
बोलला" डॉक्टर, सॉरी मी पण उगीच जबडा मिटला."
डॉक्टरांना करून माफ, उघडला जबडा पटकन
घामाघूम डॉक्टर बाहेर आले, शिडीवरून उतरले झरकन.
(आधारित.)

# बाप्पा रे बाप्पा

गोष्ट -मुक्ता बाम | चित्र - गौरव

''आई, तयार आहेस ना?'' सईने विचारलं.

आईला हसूच आलं. दरवेळी ''सई, आवर लवकर!'' असं सईला सांगावं लागायचं.

आज मात्र सई सर्वात आधी दारापाशी जाऊन थांबली होती! आज तिच्या लाडक्या बाप्पाची मूर्ती निवडायला जायचं होतं ना! सईच आईचं बोट धरुन तिला घेऊन निघाली.

''आई बघ! केवढ्या मुर्त्या!'' ''मुर्त्या नाही गं सई, मूर्ती!''

''पण या एवढ्या मूर्ती आल्या कुठून?'' सईचा प्रश्न ऐकताच गणेशदादा हसला. तिला आत घेऊन गेला.

''विचार त्यांनाच!''

''हॅलो!'' ती कुजबुजली.
आणि अचानक सगळ्या मूर्ती तिच्याकडे पाहू लागल्या!
''तुम्ही इथे कसे आलात?''
''आम्हाला घेऊन कसं जाणार यावरच बोलतात सगळे! आम्ही आलो कसे हे विचारणारी तू पहिलीच आहेस!'' कोपऱ्यातला मोठ्ठा बाप्पा हसून म्हणाला.
''आम्ही सगळे शाडूच्या मातीपासून तयार झालो. आम्हाला तयार करणाऱ्याला म्हणतात – मूर्तिकार! मूर्तिकार पहिल्यांदा आकार आणि शैली ठरवतात. मग हात, पाय, डोक्याच्या साच्यांमध्ये माती भरतात.

हे आकार एकत्र जोडून त्यावर कलाकुसर करतात. पीतांबर, बाजूबंद, मुकुट, हार यांनी सजवतात. स्वच्छतेसाठी हा असा मोरपिसांचा झाडू/ कुंचा वापरतात.''

''आणि मग रंगवतात कधी?'' सईने विचारलं
''मूर्ती पूर्ण वाळल्यावर रंग देतात. सगळ्यात महत्त्वाचे असतात डोळे. त्यांच्या कामाला लिखाई असं म्हणतात. त्यांच्यामुळे मूर्ती जिवंत वाटू लागते! प्रत्येक मूर्ती वेगळी असते.
काहींचा रंग खास कारखान्यात तयार केलेला, चमकता असतो. तर काही अगदी आपल्या रंगाजवळ जाणाऱ्या असतात.''
''माझ्यासारख्या!'' पलीकडे बसलेला छोटा बाप्पा सईला म्हणाला.

''आता या
मूर्ती बघ ''

'' माझ्यासारख्या मूर्ती
पुराणांत लिहिलं आहे तशा
वर्णनाच्या असतात.''

अलंकारांनी सजलेला
एक बाप्पा म्हणाला.

''मी तर दर वर्षी त्याच
साच्यातून तयार होतो. जशी
मूर्ती आजोबा घेऊन गेले, तश्शीच
मूर्ती आता नातू घेऊन जातो!''

''मोठमोठ्या मंडळांमध्ये
माझ्यासारखी 'वैभवसंपन्न'
मूर्ती हवीच!''

''आमच्या तर
नावांची मंडळं आहेत!
ओळखलंस ना सई?''

''लालबागचा राजा
आणि श्रीमंत दगडूशेट
हलवाई!'' सई
उत्साहाने म्हणाली
आणि त्यांच्यासारख्या
दिसणाऱ्या छोट्या मूर्ती
खूश झाल्या!

‘‘किती भारी आहे हे! बाप्पाची मूर्ती तयार कशी होते हे तर कळलं, पण त्या मूर्तीत बाप्पा कधी येतो?’’
सईचा हा प्रश्न ऐकून बाप्पाचे डोळे चमकले. तो हसून म्हणाला, ‘‘मी सगळीकडेच आहे. नुसत्या मातीतही आणि त्या मातीच्या मूर्तीतही!’’
‘‘म्हणजे जर मी घरी मूर्ती तयार केली तर तू त्यातही असशील?’’
‘‘मनापासून केलेल्या प्रत्येक गोष्टीत मी असतोच!’’

या गणेशोत्सवात, बाहेरुन आणलेल्या मूर्तीसोबत सईने घरी तयार केलेली मूर्तीही मखरात बसणार आहे. सईने तयार केलेला हा बाप्पा थोडा पारंपरिक आहे, थोडा आधुनिक आहे, थोडा वैभवसंपन्न आहे पण पूर्ण ‘तिचा’ आहे, कारण तो तिने खरंच मनापासून केला आहे!

विशेष आभार : हृषिकेश जोशी, गणेश मादुस्कर
(रा. वि. मादुस्कर आर्ट, गिरगांव, मुंबई.)

**हॅलो,**
**मी नितीनदादा!**

**ताल से ताल मिला**

गणेशोत्सवात ढोल-ताशा वाजवतात. तू ऐकलं आहेस ना?
या ढोल-ताशाचा ताल वाजवायला आवडेल का तुला? डबे, स्टूल आणि घरातल्या वेगवेगळ्या वस्तू वापरून हा ताल कसा वाजवायचा ते मी या व्हिडिओमध्ये सांगितलं आहे. तू, आई-बाबा, आजी-आजोबा आणि तुझ्या मित्र-मैत्रिणींबरोबर हा ताल नक्की वाजवून बघ.
तुम्ही वाजवतानाचा व्हिडिओ आम्हाला पाठवा. 9172136478

# ड्रॅगन

कविता - विनोद नागपुरे
चित्र - पूर्ती बापट

एक छोटा **ड्रॅगन**
सापडला जर मला
खाऊ पिऊ घालून
छान ठेवीन त्याला
दूध पाजेन त्याला बशीत
झोपवीन माझ्या कुशीत
नेईन त्याला खेळायला
बसून त्याच्यावर उडायला
एका क्षणात मला
तो शाळेत घेऊन जाईल
खालची सारी गर्दी आम्हाला
आ वासून पाहील

लाल पिवळ्या ज्वाळा
निघतील त्याच्या तोंडातून
भरीताची वांगी आई
घेईल त्यांच्यावर भाजून
सगळे होईल छान
फक्त एकच अडचण येईल
माझ्यासोबत ड्रॅगु माझा
आईसक्रीम कसे खाईल?

# चिकू Piku

गोष्ट - अमृता कावणकर | चित्र - भक्ती दलाल

चिकू झाडाखाली निवांत बसला होता. अचानक एक चतुर त्याच्या डोक्यावरून उडत गेला. ''वेगळाच आहे हा!''

चिकू त्याच्याकडे बघत होता. तो चतुर भिरभिरत झाडावर जाऊन बसला आणि एकदम त्या चतुराची खारुताई झाली. तिने चकचक करत उंबराची फळं खाल्ली. ''अरे! हे कसं शक्य आहे?'' चिकू झाडामागे लपून त्या खारीला बघत होता. तितक्यात खारुताईचा चमकणारा साप झाला. साप खाली आला आणि तळ्याच्या दिशेने सरपटत निघाला.

चिकूचा त्याच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता.

पाण्यापाशी पोचताच सापाचा झाला मासा आणि तो पाण्यात गुडूप झाला. ''तो मासा कुठे गेला?'' चिकू हळूच तळ्याजवळ आला. तितक्यात पाण्यातून एक मोठा पक्षी बाहेर आला आणि म्हणाला,



''काय! चमकलास ना? मी डीगू. मी दूर देशातून आलोय. आमचं जग वेगळं आहे. वर्षातून फक्त एक दिवस मला इथे.. तुमच्या जगात येता येतं. मी खरंतर एक अवाढव्य प्राणी आहे. मला बघून सगळे घाबरतील म्हणून मी वेगवेगळ्या रूपात इथे मस्त भटकतो. मजा करतो आणि पुन्हा आमच्या जगात निघून जातो. ही जागा मला खूप आवडते म्हणून मी दरवर्षी इथेच येतो.''

''घाबरलोच होतो मी.'' चिकू म्हणाला.

''घाबरू नकोस... मी कोणाला त्रास देत नाही.''

''तू वर्षातून एकदाच इथे येतोस? पण इथे आजूबाजूला अजून खूप छान छान जागा आहेत. तिथे का नाही जात तू?''

''हीच जागा मला आवडते. कारण इथेच या झाडाखाली माझा जन्म झाला होता. हे झाड, हे तळं खूप खूप आवडतं मला. इथे आल्यावर आईला भेटल्यासारखं वाटतं!'' चिकूला हा आगळावेगळा प्राणी आवडला. ''आता प्रत्येक वर्षी तू येशील तेव्हा झाड आणि तळ्याबरोबर मलासुद्धा भेटशील ना?''

''जरूर भेटेन. तुही आवडलास मला.''

''म्हणजे आपण मित्र झालो. पण डीगू मला तू खरा कसा दिसतोस ते बघायचंय. प्लिज... एकदाच दाखव ना!''

''ठीक आहे. पण घाबरू नकोस हं.''

डीगूचं अंग कसं असेल? कागदाचे किंवा कापडाचे तुकडे
चिकटवून त्याला छान सजव


DINO GAME
- जुई चितळे
चित्र - मधुरा वाणी
व्हेलॉसिरॅप्टरने पकडलं. पुन्हा पहिल्या घरात जा.
WINNER
टी रेक्स तुला खायला येतोय.. मागे पळाSSS ५ घरं मागे जा
या पिल्लाची आई हरवली आहे. शोधायला मदत कर, १ डाव इथेच थांब.
प्रेमळ ब्रॅकीओसॉर भेटला. त्याच्या लांब मानेवरून ५ घरं पुढे जा.
डायनोसॉरची अंडी दिसली. त्यातून पिल्लू बाहेर येताना बघ, २ डाव इथेच थांब.
ट्रायसेरॅटॉप्सच्या पाठीवर बसून आणखी एकदा फासा टाक आणि पुढे जा.
START
1. 2. 3. 4. 5. 6. 7. 8. 9. 10. 11. 12. 13. 14. 15. 16. 17. 18. 19. 20.

# फिशिरा®

गोष्ट - जुई चितळे | चित्र - ओंकार महामुनी

फिशिरा आणि टम्पू व्हेल एकदा टम्पूच्या आईबरोबर फिरायला गेले होते. वेगळ्याच ओबड धोबड आकाराची गुहा, खूप मोठे कोरल्स आणि खडक तिथे होते. टम्पीकाकू म्हणाल्या, ''पूर्वी इथे टम्पेश्वर नावाचे हुशार आणि शूर व्हेल आजोबा राहायचे. पूर्वी म्हणजे खूपच खूप वर्षांपूर्वी... मोजतापण येणार नाही एवढ्या आधी! त्यांची गोष्ट सांगू?''

टम्पू आणि फिशिरा गोष्ट गोष्ट म्हणून नाचायलाच लागले. टम्पीकाकू सांगायला लागल्या, ''एकदा टम्पेश्वरांना इथे पोहता पोहता एक विचित्र खवले आणि काटे असलेली शेपूट दिसली. कोणाची शेपूट आहे बघायला ते पुढे पुढे गेले तर तिथे एखाद्या डोंगराएवढा मोठा राक्षस होता. स्पिनोसॉर त्याचं नाव.''

''तुमच्यापेक्षाही मोठा होता तो?'' फिशिराने आश्चर्याने विचारलं.
''हो.. खूपच खूप मोठा! खरंतर त्याचं घर पाण्याबाहेर जमिनीवर होतं पण तो शिकार करायला इथे यायचा. तो इथे उभा राहिला की त्याचं डोकं पाण्याबाहेर जायचं आणि पाय खाली समुद्राच्या तळाशी टेकायचे.

तर टम्पेश्वरांना तो दिसला. लांबच लांब शेपूट इकडून तिकडे हलवत बसला होता. शिकार शोधत असणार. कुठेतरी लपून बसायला पाहिजे म्हणून टम्पेश्वर घाईघाईने पोहत गुहेत जायला लागले.. पण..



''नेमकी स्पिनोसॉरची हलणारी शेपूट त्यांना लागली.

त्याने लगेच पाण्यात डोकं घालून खाली पाहिलं आणि त्याला टम्पेश्वर दिसले. तो त्यांच्या जवळ आला.

या गुहेपेक्षा मोठ्या तोंडातून खडकाएवढे मोठे सुळे बाहेर आले होते त्याचे!... घाबरून टम्पेश्वरांना हलतासुद्धा येईना.''

''बापरे... मग काय झालं? त्याने खाऊन टाकलं टम्पेश्वरांना?''

''नाही. ते जरा भानावर येऊन पोहायला लागले. तर त्या राक्षसाने त्यांना शेपटीने अडवलं आणि पुन्हा जवळ आणलं. पुन्हा पुन्हा असं झाल्यावर टम्पेश्वरांना कळेना. हा आपल्याला खातसुद्धा नाहीये आणि जाऊही देत नाहीये. नक्की भानगड काय आहे?'' ''मग काय झालं पुढे?''



''टम्पेश्वरांनी त्याच्या तोंडाजवळ जाऊन नीट पाहिलं तेव्हा त्यांना दिसलं की त्याच्या तोंडात एक शार्क मासा होता. पण शार्कचं फिन त्याच्या घशात अडकलं होतं.

त्याने शार्क माशाला गिळण्याचा प्रयत्न केला पण शार्क अडकूनच बसला.
टम्पेश्वरांनी ठरवलं की याला मदत करायची. त्यांनी घाबरत घाबरत राक्षसाच्या तोंडात जाऊन त्या शार्कला गुदगुल्या केल्या. आणि आतून स्पिनोसॉरच्या घशाला खाजवलं. त्याबरोबर स्पिनोसॉर खोकायला लागला आणि शार्कपण वळवळला.

घशातून सुटला. जीव वाचवायला बाहेर पडून शार्क झुपकन लांब निघून गेला.''

''टम्पेश्वरांचं काय झालं पुढे?'' ''आता हा भुकेला स्पिनोसॉर आपल्याला गिळतो का काय असं वाटलं त्यांना. पण बहुतेक स्पिनोसॉरचा घसा दुखायला लागला होता. तो तोंड मिटून झपाझप समुद्राच्या बाहेर निघून गेला. आणि त्यानंतर पुन्हा कधीही समुद्रात आलाच नाही. तेव्हापासून शार्क मात्र व्हेल माशांचे जरासे मित्र झाले. ते व्हेलवर सहसा हल्ला करत नाहीत.'' ''भारी होती गोष्ट!'' तेवढ्यात मागच्या गुहेतून जोरात आवाज आला ''घर्रर्र र्रर्रर्र'' ''आऽऽऽ स्पिनोसॉऽऽऽर'' फिशिरा घाबरून जोरात किंचाळली. गुहेत लपलेला टम्पू हसत हसत बाहेर आला.

गोष्ट - शिवानी पेठे | चित्र - गिरीश मालप

चार्ल्स एका मोठ्या जहाजाने प्रवासाला निघाला. त्या जहाजाचं नाव होतं HMS Beagle ''या प्रवासात भरपूर फिरायचं, वेगवेगळे प्राणी, पक्षी, किडे, कीटक बघायचे. गोळा करायचे आणि त्यांचा अभ्यास करायचा.'' असं चार्ल्सने ठरवलं होतं.

HMS Beagle जहाज गॅलापागोस नावाच्या बेटांवर आलं. तिथे भरपूर वेगवेगळी झाडं होती. या बेटांवरची मोठ्ठाली कासवं आणि इग्वाना बघून सगळेच थबकले. चार्ल्सला या बेटांवर फिंच नावाचे छोटे पक्षी दिसले. हे पक्षी कसे दिसतात? त्यांची चोच, रंग, आकार तो बघत होता. प्रत्येक बेटावरचे फिंच पक्षी थोडे थोडे वेगळे होते.

''असं कसं! पक्षी तोच आहे पण प्रत्येकाचे पाय, रंग, आकार, चोच वेगळे कसे?'' चार्ल्सने एक गोष्ट बघितली, ज्या बेटावर भरपूर किडे, कीटक होते तिथल्या फिंच पक्ष्यांची चोच लांब आणि बाकदार होती. ज्या बेटावर भरपूर फळं होती तिथल्या पक्ष्यांची चोच मजबूत होती, पोपटासारखी. ज्या बेटांवर खायला बिया होत्या तिथल्या फिंच पक्ष्यांची चोच धारदार होती.

बराच विचार करून, अभ्यास करून चार्ल्सच्या लक्षात आलं की हे सगळे फिंच पक्षी खूप वर्षांपूर्वी एकसारखेच होते. पण हळू हळू फळं खाणाऱ्या पक्ष्यांना पिल्लं झाली तेव्हा काही पिल्लांची चोच थोडीशी टणक झाली. त्यांच्या काही पिल्लांना आणखी टणक चोच होती असं करत करत अनेक पिढ्यांनंतर हा बदल पक्का झाला. तसंच किडे खाऊन काहीं पक्ष्यांची चोच बाकदार झाली आणि बिया फोडण्यासाठी काहींची टोकदार झाली. तसेच त्यांचे पंजेसुद्धा वेगळे होते.

चार्ल्सने एक महत्त्वाचा शोध लावला. त्याने सांगितलं की प्रत्येक प्राणी, पक्षी जिथे राहतो, जे खातो त्याप्रमाणे त्याच्या शरीरात बदल होत जातो. जे प्राणी बदल करत नाहीत. तसेच राहतात ते नष्ट होतात. काही डायनोसॉर बदलले नाहीत तसेच राहिले म्हणून तेसुद्धा नष्ट झाले.

सुप्रसिद्ध संशोधक चार्ल्स डार्विन यांनी लावलेला हा शोध खूप महत्त्वाचा होता. हे छोटे फिंच पक्षी आता Darwin's Finches या नावाने ओळखले जातात.

**माणूससुद्धा हळूहळू बदलत गेला. आधी त्याला शेपूट होती, त्याच्या अंगावर केस होते. तो काहीसा गोरिलासारखा दिसायचा. खूप पूर्वीच्या या माणसाला आपण नाव दिलंय homo habilis बदल होत होत होत आपण आत्ता जसे दिसतो तिथपर्यंत पोहोचलो आहोत.अजूनही माणसात बदल होत जाणार आहेत. तुला काय वाटतं पुढे माणूस कसा दिसेल? त्याचं चित्र काढ.**



**व्यक्तीअंतर्गत बुद्धिमत्ता**
स्वतःशी बोलून, विचार करून काहीतरी शोधून काढणं या बुद्धिमत्तेमुळे शक्य होतं.

## चिमणी चित्रं

- आभा भागवत

इथे दाखवल्याप्रमाणे मधली तीन बोटं दुमडून हाताचं चित्र काढ. त्याचा डायनोसॉर तयार करुन सुंदर रंगव. तो कुठे उभा असेल अशी कल्पना करुन जमीन आणि आकाश, गवत किंवा जंगल पण काढ.



**दृश्य-अवकाशीय बुद्धिमत्ता**

एका आकारात वेगळं काही चित्र सापडण्याची सुरुवात होण्यासाठी हातापायाच्या आकारातून अशी चित्रं तयार करता येतात.
यातून मुलांची क्रिएटिव्हिटी वाढीस लागते.

# हातांची जादू

- श्रावणी उभे

असं म्हणतात की चीन देशात खूप खूप खूप वर्षांपूर्वी ड्रॅगन राहायचे. ड्रॅगन्स माणसांना मदत करायचे. त्यांची आठवण राहावी म्हणून चिनी लोक वर्षाच्या सुरुवातीला ड्रॅगन उत्सव साजरा करतात. या उत्सवात लोक ड्रॅगन डान्स करतात.

ड्रॅगनचं एक मोठं पपेट तयार करतात. त्या पपेटला काठ्या जोडतात. दहा–बारा माणसं या काठ्या धरून मस्त नाच करतात. हा नाच बघण्यासाठी वेगवेगळ्या देशांतून लोक चीनमध्ये येतात. ड्रॅगनला 'थँक यू' म्हणतात. आपणसुद्धा एक नाचणारा ड्रॅगन तयार करूयात.

**साहित्य- २ काड्या, सोबत दिलेलं ड्रॅगनचं चित्र, कात्री, सेलोटेप आणि डिंक**

1. चित्रातलं ड्रॅगनचं तोंड आणि शेपूट कापून घे.
2. दिलेल्या कागदाच्या दोन पट्या कापून पंख्यासारख्या घड्या घालून घे. या दोन्ही पट्या एकमेकांना चिकटवून घे.
3. आता या पट्टीचं एक टोक ड्रॅगनच्या डोक्याला आणि दुसरं टोक शेपटीला चिकटव.
4. सगळ्यात शेवटी तोंडाजवळ एक काडी आणि शेपटीला एक काडी लाव. नाचणारा ड्रॅगन तयार झाला. काड्या वर-खाली हलवून ड्रॅगनला नाचव.

**मुखपृष्ठ : हबीब अली**

**आतील मांडणी :** OneZeroEight Brandcomm Pvt Ltd.

**मुद्रितशोधन :** वैशाली कार्लेकर, जुई चितळे

**Editor : Amruta Kawankar**

**Language:** Marathi, English

**Published by :**
**Amruta Govind Kabade,**
**OneZeroEight Learning Pvt Ltd.**
Flat No. 10, Narayan Complex,
2nd Floor, Hingne Kh.,
Sinhagad Road, Pune 411 051

**Place of Publication :**
Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor,
Hingne Kh., Sinhagad Road, Pune 411 051

**Printed by : Atharva Print Creation**
S. No. 91/1, Plot No. 8,
Tulshibaugwale Colony,
Sahakarnagar, Pune 411 009

**For subscription:**
Visit www.chikupiku.com Or
call on 9172136478

RNI TC NO.: MAHBIL/2019/78568,
Declaration No.: SDM/Haveli/SR/59/2019,
Date of Publication: 01/09/2024

www.onezeroeight.in